जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in





६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया एम.ए.

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया बी.कॉम.



❖ वर्ष ४८ वे ❖ अंक ३ रा ❖ नोव्हेंबर २०१६ ❖ वीर संवत २५४३ ❖ विक्रम संवत २०७३


या अंकात | पान नं.


- जिनेश्वरी १५
- कव्हर तपशील २४
- प्रेम और प्रभु ३३
- सावधानी का ऐलान ३९
- देश मेरा My Country ४१
- पत्नी गृहलक्ष्मी तो पती गृहपति ४७
- निर्लिप्त रहो ४९
- कृपणता और मितव्ययिता ५१
- असलं वेगळेपण काय कामाचं ? ५३
- सब कुछ 'स्व' में है ५५
- क्या अहिंसक जीवन जीना संभव है ६५
- प्रयत्न मत छोडिए ७४
- ऐसी हुई जब गुरुकृपा – उडाऊ ना बण ७७
- वाचकांचे मनोगत ७९
- धार्मिक सिध्दातो की व्यावहारिक सुदृढता आज की आवश्यकता ८१
- अवयवदान श्रेष्ठ अभयदान ८३
- हास्य जागृति ८४
- शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र नवीन नमुन्याप्रमाणे ८५
- भारतीय जैन संघटना – परिचय संमेलन ८६
- जैन फुलराणी, मुंबई – परिचय संमेलन ८६
- अहं का त्याग : अर्हम् की यात्रा ८७
- अपराधा पासून सावध ९५
- मृत्यु किसी की भी नहीं होती १०१
- कडवे प्रवचन १०२

- जीतो फूड बँक, पुणे १०३
- सुर्यदत्ता ग्रुप, पुणे १०४
- कवि युगराज जैन, मुंबई – पुरस्कार १०४
- कोठारी चॅरिटेबल ट्रस्ट – वडगाव शेरी १०७
- ओसवाल महिमा, जोधपूर १०८
- गौतम लब्धी फाऊंडेशन – अधिवेशन १०८
- जैन सोशल फेडरेशन – अहमदनगर १०९
- आनंद अचल ग्रुप फाऊंडेशन, पुणे १०९
- विविध धार्मिक, सामाजिक व राजकीय बातम्या



जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित, एकूण अंक १२

❖ पंचवार्षिक वर्गणी –२२०० रु. ❖ त्रिवार्षिक वर्गणी – १३५० रु.

❖ वार्षिक वर्गणी – ५०० रु. ❖ या अंकाची किंमत ५० रुपये.

❖ वर्गणी व जाहिरात रोखीने / On line / RTGS / AT PAR चेक / पुणे चेकने / मनीऑर्डर / ड्राफ्टने / 'जैन जागृति' नावाने पाठवावी.

● www.jainjagruti.in ● www.facebook.com/jainjagrutimagazine

हे पत्रक संपादक, प्रकाशक, मुद्रक व मालक श्री. संजय कांतीलाल चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, पर्वती, पुणे ९ येथे छापून ६२, ऋतुराज सोसायटी, पुणे ३७ येथे प्रसिद्ध केले. लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवायीसाठी पुणे न्यायालय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.



# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

वर्गणी व जाहिरात – रोख / मनिऑर्डर / ड्राफ्ट / AT PAR चेक / पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA  Branch : Market Yard, Pune 37.

Current A/c No. : 10521020146  IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१,** **www.jainjagruti.in**

**Email : jainjagruti1969@gmail.com • Press Email : prakash.offset@rediffmail.com**

## ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

- ❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९१९४०९
- ❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
- ❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
- ❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
- ❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
- ❖ **सदाशिव पेठ, परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
- ❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
- ❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
- ❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
- ❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९
- ❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
- ❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
- ❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
- ❖ **घोडनदी, जि. पुणे –** श्री. पारसमलजी बांठिया, मो. : ९२२५५४२४०६
- ❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
- ❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
- ❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१
- ❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
- ❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
- ❖ **धनसोली, नवी मुंबई –** श्री. सुभाष केशरचंदजी गादिया, मो. ९१५८८८८६८५
- ❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
- ❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
- ❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
- ❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
- ❖ **श्रीरामपूर** –श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
- ❖ **लासलगाव –** श्री. मनसुखजी साबद्रा, मो. : ९३२६३२५३४७
- ❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
- ❖ **अंमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
- ❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
- ❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
- ❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
- ❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
- ❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
- ❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२५४२२५३
- ❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री. प्रवीणऋषिजी म.सा.** *(क्रमशः)*

## अध्याय ६ – क्षुल्लक निर्ग्रंथीय

सत्य परमेश्वर आहे. परंतु जेव्हा आपण सत्याचा शोध घ्यायला जातो तेव्हा दुःखच आपल्या वाट्याला येते. सत्य परमेश्वर आहे तर त्याला जाणून घेतल्याने दुःख का मिळते ? काय आहे या दुःखाचे कारण ?

अज्ञानातून दुःखाचा जन्म होतो. हे प्रसिध्द वाक्य आहे. या प्रभुवाणीत भगवंत जीवनाचे परमसत्य प्रसादरूपाने देत आहेत की, दुःखामुळे व्यक्ती अज्ञानी बनते. जगाचे अज्ञान दूर करायचे असेल तर सर्वप्रथम त्यांचे दुःख दूर करायला हवे.

**दुःखातून अज्ञानाचा जन्म**

**जावन्तऽविज्जा पुरिसा, सव्वे ते दुक्खसंभवा।**
**लुप्पंति बहुसो मूढा, संसारम्मि अणंताए ।।**

दुःखी व्यक्ती अज्ञानी होते आणि अज्ञानामुळे पुन्हा-पुन्हा गोंधळते. जो अज्ञानी असतो त्याला मूर्ख म्हणतात. ज्याला समज शक्ती नसते त्याला मूढ म्हणतात. ज्यांचे मन काम करीत नाही त्याला मूढ म्हणतात. ज्याची बुध्दी काम करीत नाही त्याला मूर्ख म्हणतात. ज्याची बुध्दीच काम करीत नाही त्याला समज कशी देता येईल ? दुःखी व्यक्तीच्या बुध्दित सुधारणा करता येते. परंतु त्याला समंजसपणा देता येत नाही. जेव्हा दुःखातून मुक्ती होते तेव्हाच समंजसपणा येतो.

माणसाला हे जाणवते की माझे दुःख सर्व लोक केवळ ऐकून घेतात त्याला कोणीही दूर करीत नाही. तरी सुध्दा लाचारीने मागत आणि वागत असतो. मला वाचवा **नालं ते मम ताणाय** प्रत्येक दुःख, विघ्न आणि संकटाच्यावेळी अनुभव येतो की आपले आई - वडील, भाऊ, बहीण, आप्तजन, स्वकीय कोणीही मला दुःखापासून मुक्त करण्यास समर्थ नाही. ही अनुभुती ही जाणीव असून, जो तिथेच वारंवार अपेक्षा ठेवतो. तो मूढ प्राणी. विचार करण्याजोगी गोष्ट आहे की जो स्वतः दुःखी आहे तो दुसऱ्याला सुखी कसे करू शकेल? जो स्वतःच फसलेला आहे तो कुणाला कसं बाहेर काढू शकेल ? ही कोंडी दूर करत भगवंत अतिशय महत्वपूर्ण सूत्र देत आहेत की **जीवनात सत्याची - समाधानाची - सुखाची प्राप्ती करायची असेल तर जीवनातील सर्वश्रेष्ठ सत्याचा, कल्याणकारी सत्याचा शोध करायला हवा. ''अप्पणा सच्च मेसेज्जा'' - स्वतःमध्येच सत्य शोधा .... स्वतःमध्येच सुख-शांती-आनंद सामावलेलं आहे. त्याला प्राप्त करण्यासाठी मंगल भावनेने समस्त मैत्रीचे संबंध जोडा, त्वरीत मित्रत्वाच्या कल्पवृक्षाची, कल्पनेतीत सावली आणि समृध्दीची अनुभूती होईल.** शर्त केवल इतकीच स्वतः स्वतःला शोधा. आपणच आपल्याला भेटा आणि असा शोध केला होता राजा प्रदेशीने.

**आत्म्याचा शोध व बोध**

राजा प्रदेशीने सत्याचा शोध घेतला. केशी मुनींची भेट होण्यापूर्वी राजा सत्याच्या शोधात होता आत्मा आहे की नाही ? आत्मसत्ता खरंच आहे का ? परंतु अज्ञानामुळे हा शोध स्वतःमध्ये नव्हे दुसऱ्यामध्ये घेत होता. आत्मा आहे की नाही ? या शोधासाठी एखाद्या अपराधी व्यक्तीला लोखंडी पेटीत चारी बाजूंनी अगदी

सील बंद करायचा. काही दिवसांनी ती पेटी, उघडून बघायची शरीरात प्राण आहे की नाही ? पेटीला तर कोठेही फट नाही मग आत्मा असता तर निघून जातांना फट झाली असती याचा अर्थ असा की आत्मा नसतो. असा निष्कर्ष राजा प्रदेशीने काढला. एकदा दुसऱ्या एका अपराध्यावर राजानेच प्रयोग केला. शरीरातील प्रत्येक भागात जीव कुठे आहे, हे पाहण्यासाठी त्याच्या शरीराचे तुकडे केले. डोक्यात, बोटात, नखात, पोटात प्रत्येक अवयवाचे तुकडे-तुकडे करून शोध घेतला की जीव कुठे आहे का ? जीव सापडला नाही, संभ्रमात पडला. परमात्मा आपल्याला सावध करत इशारा देत आहे की भाविकांनो ! राजा प्रदेशी सारखे आपणही सत्याचा शोध दुसऱ्यांच्या जीवनात करतो आहे आणि हे निश्चित आहे की **दुसऱ्यांच्या जीवनात केलेला शोध बोधप्राप्ती ऐवजी भ्रांति-भ्रमंतीच निर्माण करतो. जर सत्य प्राप्त करायचे असेल तर ते स्वत:च्या जीवनाशिवाय इतरत्र सापडूच शकत नाही. ते मिळणे अशक्य आहे.**

**स्वत:च्या शरीरात आत्मा आहे की नाही हे साधारण ज्ञानाने जाणले जाऊ शकते, परंतु दुसऱ्याच्या शरीरातील आत्मज्ञानासाठी दिव्यज्ञानाची आवश्यकता आहे.** एकदा स्वत:च्या आत्म्याचे भान झाले की, दुसऱ्याच्या शरीरातील आत्मसत्तेचे ज्ञान होऊ शकते. आपल्या अंत:करणात भगवंत सत्तेची अनूभूती झाली की संपूर्ण विश्वात - चराचरात भगवंतसत्ताच दृष्टीत पडते.

**सत्याचा शोध, शिवायचे संबंध, सुंदर जीवन**

**अप्पणा सच्चमेसेज्जा** वारंवार भगवंत कळकळीने सांगत आहे की स्वत:मध्ये सत्याचा शोध करा. दुसऱ्यांमध्ये करण्यात शक्ती आणि वेळ घालवणे मूर्खपणा आहे. फक्त सत्यप्राप्तीच्या शोधात जाताना सावधगिरी बाळगा की हा सत्याचा रस्ता फार धोकादायक असतो. **सत्याबरोबर जर मित्रत्वाचा संबंध नसेल तर सत्यविनाशक ठरते.** सत्याबरोबर शिवाचा संबंध नसला तर सत्य तांडवनृत्य निर्माण करते. हा धोका टाळावा म्हणून भगवंतांनी सत्याच्या शोधासाठी सुरक्षित मार्ग दिला आहे. **मित्तीं भूएसू कप्पए** समग्र विश्वातील जीवसृष्टीला आपल्या मैत्रीच्या अमृतरसाने तृप्त करून मगच सत्याच्या शोधाचा प्रारंभ करा तर सत्यविधायक ठरेल. कोणाशीही शत्रुत्वाचा संबंध ठेवून केलेली सत्यप्राप्ती गोशालकाची तेजोलेश्या होऊन जाते. सत्य मिळेल पण शोध घेणारा चंडकौशिक बनून जाईल. सत्य सापडेल पण शोध घेणारा दुर्योधन बनेल, हे सर्व टाळण्यासाठी सुरक्षित मार्गाचा अवलंब करा.

सत्याचा शोध घेणारे खूप लोक असतात पण सत्याचा शोध घेताना जगबरोबर मैत्रीचा संबंध ठेवणारे विरळेच असतात.कारण जसजसा व्यक्ती सत्याच्या सागरात खोलवर जाऊ लागतो तसतसे त्याच्या अंतरंगातून इतरांबद्दल शत्रुत्वाचे बुडबुडे येऊ लागतात. बंधूंनो, आपण सुध्दा भगवंतांची आराधना करीत असताना देखील दुर्भावना ग्रसीत होतो की इतर लोक आराधना करीत नाही त्यांच्याबद्दलची दूषित भावना आपली आराधना दूषित करून टाकते. जेव्हा आपण दान करतो त्या उत्कृष्ट भाव अवस्थेतसुध्दा जेंव्हा आपण दान न देणाऱ्याकडे तुच्छतेने बघतो तेव्हा अंतरंग उत्कृष्ट भावनेऐवजी निकृष्ट भावनेने भरून जाते. परमात्मा सांगतात 'बाळा रे ! **या चुकीच्या भावनांपासून स्वत:च संरक्षण कर. आपण तप केले परंतु जे करू शकत नाही त्यांना हिणवू नका. तुच्छतेने बघू नका तरच तुमची साधना सफल होईल.' सर्वांशी मित्रत्वाचे, मांगल्याचे नाते प्रस्थापित करा. पसायदान-प्राप्ती निश्चित होणारच.**

**स्वत:ची चूक शोधा - दुसऱ्याची नाही**

सत्य शोधाची पहिली पायरी की सर्वप्रथम मला माझी चूक शोधता आली पाहिजे. आजपर्यंत दुसरा कुठे चुकतो हेच पाहिले. आता मी कुठे चुकतोय हे पहायचय. **त्याला राग का येतो हे पाहण्यापेक्षा, मला**

**राग का येतो हे शोधणे म्हणजे बोधप्राप्ती होणे.आता आपले शरीर रोगांचे, विकारांचे, विकृतीचे घर बनलेले आहे पण जेव्हा आपण सत्याच्या मार्गावर चालू लागतो, स्वत:चा शोध घेतो, तेव्हा हा देह केवळ देह नसून देवालय–मंदिर बनते आणि या मंदिरात सत्याची स्थापना झाल्यावर विकार विकृतींना जागाच राहत नाही,** प्रवेशच मिळत नाही. विकृती सहन करण्याची प्रकृती राहत नाही. म्हणूनच भगवंत सांगतात **अप्पणा सच्च मेसेज्जा** आपली चूक, आपली उणीव, आपली कमी शोधावी. कारण **दुसऱ्याची चूक शोधत बसला की राग, क्रोध येणारच. दुसऱ्यातील उणिवा दिसल्या की अहंकार निर्मिती होणारच. दुसऱ्यामध्ये प्रेम शोधले, तर लोभ निर्माण होतो. स्वत:मध्ये सत्याचा शोध घेतला व दुसऱ्याबरोबर मैत्रीचे संबंध ठेवले तर सत्य–शील प्राप्ती नक्कीच आहे**. दुसऱ्या बरोबर मैत्री ठेवताना 'व्यक्ती विशेष' मैत्री ठेऊ नये. 'व्यक्ती विशेष' मैत्रीचा दुसरा अर्थ असा होऊ शकतो की ती व्यक्ती सोडून बाकी माझे शत्रु आहेत. परंतु मैत्री ही मर्यादीत नसावी तर मैत्री ही सार्वभौम–सर्वांठायी असावी हे जीवनाचे परम सत्य आहे.

**ण कंखे पुव्व संथवं** – जोपर्यत भुतकाळाच्या अनुभवातून धारणातून आपण मुक्त होत नाही. तो पर्यंत भविष्याचे सृजन होऊ शकत नाही, मैत्री भावभावनेचा जन्म होत नाही. चुकुन सुध्दा पुर्वघटीत दू:खदायी स्मृती आठवू नये की, यानी मला धोका दिला होता, तो आजही माझ्याशी तसाच वागेल ही धारणा–धास्ती जोपर्यंत चित्तपटलावरून पुसली जात नाही तोपर्यत सार्वभौम मैत्री होऊ शकत नाही.

**मित्तिमे सव्व भएसू** हे भगवान महावीरांचे एक प्रसिध्द सर्वतोमुखी सूत्र आहे. या समस्त विश्वाशी माझा मैत्रीभाव आहे. प्राणीमात्राशी माझे मैत्रीपूर्ण संबंध आहे. मैत्रीभाव सत्याच्या अनुभूतीत कसा पूरक आहे यासाठी एक उदाहरण देता येईल.

श्रोते हो ! भारतीय संस्कृतीत पूर्वीपासून आर्युर्वेदात संशोधन होत आलेले आहे. संशोधकांनी उंदीर, माकड यांना यातना – वेदना देऊन संशोधन नाही केले. वनस्पतीवर केले, ते सुध्दा त्यांच्याशी मित्रत्वाचे संबंध निर्माण करूनच त्यांचा उपयोग करीत असे. पूर्वीचे वैद्य संवेदनशील असत त्यामुळे दुसऱ्याच्या शरीरातील संवेदना त्यांना नाडी परीक्षेद्वारा समजत असे. नाडीवर हात ठेवला की पायाच्या नखापासून डोक्यापर्यंतच्या व्याधींचे अचूक निदान व्हायचे. आताचे शिक्षण या प्राण्यांना मारून त्यावर शिकवले जाते. या जिवंत प्राणीसृष्टीशी शत्रुत्वाचे संबंध प्रस्थापित करून संशोधन चालले आहे. त्यामुळे हल्ली पोट जरी दुखायला लागले तरी साध्या संवेदनाद्वारे त्याचे निदान होत नाही. त्याला यंत्राच्या सहायाने तपासणी करावी लागते. तरीही व्याधि – निदान होत नाही, कारण सापडतच नाही. भगवंत सांगतात **मित्तीं. भूएसू कप्पए** मित्रत्व जागृत झाले की सत्याचा ठाव–ठिकाणा सापडतो, पास **जाइपहे बहू** जीवसृष्टी – प्राणी सृष्टी जवळून बघा त्यांच्याशी जवळीक करा. मैत्रीचे संबंध साधा. त्यांना जाणून घ्या नंतर तुम्ही तुमचे जीवन हवे तसे बनवू शकता.

उदाहरणार्थ – तुम्ही कधी माशीला बघितले असेल कुणीतरी घशातील बेडका (कफ) थुकलेले असते त्यावर ती बसते. त्या कफवर ती एकदा बसली की तिची कितीही इच्छा असली तरी ती उडू शकते का? उडूच शकत नाही जसा – जसा ती प्रयत्न करते ती अजून जास्त फसत जाते. परमात्मा सांगतात बाळा रे ! आपली बुध्दी उलटी झाली विपरीत झाली की आपणही त्या माशीसारखे फसत जातो.

**गवासं मणि कुंडलं** चा मौल्यवान अर्थ आहे जो जीवनाला मौलीक बनवू शकतो की जशी स्वत:ची इच्छा असेल तसेच व्यक्तीमत्व बनेल. खूप सोपे–साधे सूत्र आहे. **काम रूवी भविस्ससि** ही किमया जादू आहे या सूत्राची... हा गाभा आहे सफलतेचा

मौलिकतेचा. परमात्मा उच्चारीत आहे की, कामरूपी अर्थात तुम्ही जशी इच्छा करणार तसेच **तुम्ही निश्चित बनणार हे जीवनाचे शाश्वत - चिरंतरन सत्य आहे**

**श्रध्देयांवर संशय संशयितांवर श्रध्दा**

आपले हित ज्यामध्ये आहे त्यात अहिताची बुध्दी आणि ज्यात अहित आहे त्यात हिताची बुध्दी, ज्यांच्याबद्दल श्रध्दा ठेवायला हवी त्यावरच संशय ठेवतो आणि ज्यांच्याबद्दल संशय करायला हवा त्यावर श्रध्दा ठेवायची. ज्यावर विश्वास करायला पाहिजे. त्याच्यावर अविश्वास आणि ज्याच्यावर अविश्वास करायला हवा त्यावर विश्वास. असे विचार कधी येत नाहीत की जिच्याबरोबर ७ फेरे घेतले ती सुख देईल की नाही तेथे शंका येत नाही. माळा जप केल्यावर नक्की सुख मिळेल की नाही ही शंका डोक्यात डोकावल्याविाय रहात नाही. ज्याला ९ महीने गर्भात ठेवलं, ज्याला जन्माला घालताना दारूण प्रसववेदना सहन केल्या, ज्याच्यासाठी आजही खूप काही सहन करित आहोत तो भविष्यात आपल्या त्यागाची सहनशीलतेची जाणीव ठेवेल की नाही हा प्रश्न निर्माण होत नाही. परंतु एखाद्या गरीब - दुबळ्याला मदत करताना किती प्रश्न येतात हा याचा दुरूपयोग तर नाही करणार ? याला म्हणतात उल्टी बुध्दी, जिथे ठेवायचा विश्वास-तिथे संशय, जिथे संशय ठेवायचा तिथे विश्वास !

क्षमेवर भरोसा नाही - क्रोधानेच काम होते, यावरच अटळ विश्वास आहे. मारण्यावर विश्वासआहे वाचवण्यावर नाही. आपला हिंसेवर विश्वास आहे, प्रेमावर नाही. **आपला क्रोधावर विश्वास असतो त्यामुळे आपण समजावून सांगण्याऐवजी रागावतो. हिंसेवर विश्वास असला की, दुसऱ्याला मारण्याचा प्रयत्न होतो. आपला विश्वास प्रेमावर बसला तर द्वेषाच्या मार्गावर आपण चालुच शकणार नाही. परंतु आपला विश्वास द्रेषावर असतो. त्यामुळे प्रेमाचे गीत गाता-गाता व्देषाच्या मार्गाने जातो** व अशीआचार विचारसरणी असल्यामुळे व्यक्ती बांधला जातो.

**अधिकारामुळे साचेबध्दता**

भगवंत पुढचे सूत्र सांगत आहेत. तुम्हाला ''मुक्तांगण'' चा आनंद अनुभवायचा असेल तर अधिकार भाव गाजवणे सोडून द्या. कारण **जेथे अधिकार - तेथे धिक्कार, आपण एखाद्या व्यक्ति वस्तूवर अधिकार ठेवतो तो अधिकार ठेवण्यात आपले अफाट कर्तृत्व, आपले सृजनाचे सामर्थ्य हे सर्व आपल्या संकुचित इच्छेमुळे ठराविक साच्यामध्ये अडकले जाते. ठराविक रूपात संपूर्ण होते आणि खरंतर जेवढे आहे त्यापेक्षा कितीतरी पटीने होण्याची संभावना असते परंतु केवळ अधिकार भावनेमुळे त्या विराट संभावनेला आळा बसून जातो.** म्हणून भगवंत सांगत आहेत कोणावरही अधिकार गाजवायचा नाही, सर्वांचा स्वीकार करायचा. **सव्व मेयं चइत्ताणं** ज्याक्षणी सत्तेचा अधिकार सोडून द्याल. त्याक्षणी तुम्ही तुम्हाला जसे हवे आहात तसे व्हायला समर्थ बनाल. जीवनात महावीरांची वाणी अवतरित करा. आनंदाच्या सौख्याच्या दिव्य अनुभुतीने जीवन उजळून जाईल, हे निश्चित आहे. ज्या क्षणाला तुम्ही सत्तेचा अधिकार सोडून द्याल त्याक्षणी तुम्ही परमसत्याचे अधिकारी होण्यास समर्थ होणार. अधिकार भाव आहे, तो पर्यंत तुम्ही हवे तसे बनू शकणार नाही प्रश्न मनात निर्माण होऊ शकतो की अधिकार भाव सोडण्यासाठी काय आडव येते ? कशांच बंधन आहे ?

**बंधन कशाचे**

गुरूदेव सांगत असत, जेव्हा पोलिस चोराला पकडून नेतात तेव्हा कोणाच्या हातात बेडी असते ? पोलिसांच्या हातात की चोरांच्या हातात ? बांधलेला कोण असतो ? जरा नीट विचार करा. समजा चोर सुटला-पळाला तर तो पोलिसांच्या मागे पळणार की पोलीस त्याच्यामागे ? निश्चित पोलीसच चोराच्या मागे धावणार. जो ज्याला बांधला गेला आहे तो त्याच्या मागे धावत राहतो. भक्त देवाला बांधून ठेवतो.

आपल्या भक्तीद्वारे, म्हणून तर सांगतात देव भावाचा लंपट, सोडुन आला वैकुंठ ! भाविकांनो, भक्तवर्गसुध्दा भगवत् सत्तेशी जुडलेले असतात म्हणूनच सर्व प्रपंच - पसारा सोडून भगवत् कथा ऐकायला येतात आणि हे नितांत सत्यआहे की भगवत् सत्तेशी बांधीलकी असली म्हणजे तुम्हाला हवे तसे तुम्ही बनू शकता. सत्याला प्राप्त करू शकता. उदा. चंडकौशिकाने क्रोधावरचा अधिकार सोडला व त्याच्यावर प्रभूंचे अधिपत्य सुरू झाले व तो क्षमेचा पुजारी बनला. अर्जुनमालीने स्वत:च्या देहावरचा अधिकार सोडला तो विदेह झाला. नर-नारायण बनला.

**जेथे अधिकार भावाची सीमा संपते त्यापुढे भगवंताचे साम्राज्य सुरू होते.** 'बायबल' मध्ये सुंदर वाक्य आहे की सुईच्या छिद्रातून कदाचित उंट जाऊ शकेल पण ज्याने धन-संपत्तीवर अधिकार भाव ठेवला आहे त्याला परमात्म्याच्या राज्यात प्रवेशसुध्दा मिळू शकत नाही.

**खरे अध्यात्म**

या अध्यायाचे सारसूत्र लक्षात घ्या आणि अनुभवात आणा की जर आपल्याला क्षमा प्रिय आहे, आपल्याकडून चूक झाली आपल्याला समोरच्याकडून क्षमेची अपेक्षा असते की त्याने आपल्याला समजून घ्यावे. जशी अपेक्षा आपण स्वत:साठी ठेवतो तसाच विचार दुसऱ्यांबाबत करावा. मला क्षमा प्रिय आहे त्यालाही क्षमाच प्रिय आहे मग मी त्याच्यावर क्रोध का करावा ? मला जसा वाचविणारा प्रिय आहे तसे समोरच्यालाही वाचविणाराच प्रिय असणार आणि यालाच अध्यात्म म्हणतात.

अध्यात्म कशाला म्हणतात ? भगवंत सांगतात की **जे तुम्हाला प्रिय आहे ते सर्वांना प्रिय आहे ही भावना मनात रूजवणे-पचवणे आणि त्याप्रमाणे वागणे म्हणजे खरे अध्यात्म आहे.** क्षमा मला प्रिय आहे, समोरच्यालाही प्रिय आहे, सर्वांना प्रिय आहे. समोरच्याने मला क्षमा करायला हवी मला समजून घ्यावे तसे आपणही दुसऱ्याला क्षमा करावी. त्याला समजून घ्यावे हे आचरण म्हणजेच अध्यात्म. या उलट वागले की व्यक्ती निराशेत-अंधारात फसतच जाते. स्वत:ला प्रिय वाटणारी गोष्ट दुसऱ्यासाठी अप्रिय वाटते.

तेव्हा अध्यात्माचे गणितच चुकते, आणि व्यक्ति अध्यात्मास मुकते.

**आयाणं णरयं**

भय न देणारा जसा मला प्रिय आहे तसाच चरा-चरातील सर्व जीवांना भय न देणारा प्रिय असतो. करूणा सागर परमात्मा प्रभु महावीर साधनेच्या मार्गातील बाधा दूर करण्यासाठी छोट्या-छोट्या गोष्टींना उजाळा देताना सांगत आहेत ''हे साधका ! जगातील कोणत्याही सूक्ष्मतिसूक्ष्म जीवाला भय देऊ नको, वैर देऊ नको, जो पर्यंत अंतरंगात भय व शत्रुता असेल तो पर्यंत हिंसा करायची प्रवृत्ती होईल, इजा करायची वृत्ती होईल म्हणूनच हिंसामुक्त व्हायचे असेल, संघर्षमुक्त जीवन जगायचे असेल तर भय व वैर अंतरंगातुनच काढुन टाका, क्षमेची आराधना करा, मांगल्याचे सृजन होईल, आनंदाचा स्वर्ग निर्माण होईल. दिल्याशिवाय घेणे म्हणजे नरक-नारकीयत्व आहे. केवळे दिलेलेच घेणे म्हणजे स्वर्ग आहे या क्रांतिकारीअध्यायात भगवंत खूप गहन विचार मांडत आहे. दिल्याशिवाय घेणे ही चोरी समजली जाते. आपली प्रचलित धारणा आहे की हिंसा करणाऱ्याला नरक मिळतो. पण या अध्यायात भगवंत अगदी स्पष्ट सांगत आहे की चोरीमुळे नरकप्राप्ती होते. कोणा जवळून काही घ्यायचे असेल तर त्याला मोबदला दिल्याशिवाय घेऊ नये. भगवंत दिव्य घोष करीत आहेत.

**भणंता अकरेंता य, बंध-मोक्ख-पइण्णिणो।**
**वाया विरिय-मित्तेण, समासासेंति अप्पयं ।।**

काही लोकांना धर्माची जाण असते. काही जणांना धर्माची समज असते. ते तत्त्वज्ञानाचा उपदेश देतात. पाप कशात ? पुण्य कशात ? सर्व सांगतात पण करत

काहीच नाही ! लक्षात घ्या, उपदेश देणे सोपे, उपचार करणे अवघड, धर्म उत्तम - श्रेष्ठ आहे हे व्यासपीठावर बसून प्रवचन करणे सोपे असते. जनता वाहवाही करेल परंतु स्वत:च्या जीवनात जेंव्हा क्षमा करण्याचा प्रसंग उद्‌भवेल तेव्हा उपदेश आठवून तसे आचरण केले तरच धर्म होतो. क्षमा केली नाही तर तुमचे वास्तविक स्वरूप लक्षात येते की हा तर केवळ ''बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी'' होती. खायला काही नाही, जगायलाही काही नाही. भगवंत सांगतात जीवनातील समस्येचे निराकरण होईल ते फक्त अनूभूतीनेच आचरणातून होईल. **निव्वळ शब्दांनी समस्या निवळत नाही. केवळ तर्काने समाधानाचा प्रयत्न फसवा ठरतो. भाषा किंवा शाब्दिक ज्ञान सुरक्षा देत नाही, आचरणच हे सर्व देऊ शकते परंतू उपदेश आचरणात न येण्याचं मोठं कारण आहे आसक्ती.**

**आसक्तीतून दु:खाची निर्मिती**

दु:खी कोण होतो ? भगवंतांनी सांगितले की **जो शरीरात आसक्त , रूपात आसक्त , रंगात आसक्त होतो तो दु:खी होतो.** आसक्ती म्हणजे नेमकं काय? इच्छा, कामना म्हणजे आसक्ती नव्हे कारण भगवंत कृपेची, गुरूप्रीतीची सुध्दा इच्छा असतेच ना ? परंतु ती कामना म्हणजे आसक्ती नसते. आसक्तीची व्याख्या लक्षात घ्या. **ज्यामध्ये सक्ती येते ती आसक्ती,** ज्यात आपण निरूपाय होऊन जातो ती आसक्ती आणि याउलट **ज्या भावनेत आपण दृढ बनतो ती भक्ती असते.** जेथे सक्तीचा अनुभव येतो. नाइलाजाचा, लाचारीचा, बंधनाचा अनुभव येतो त्याला आसक्ती म्हणतात. जे शरीरात आसक्त असतात ते शरीराला सजवत राहतात. सांभळणं वेगळं आणि सजवणं वेगळं. सावरणं निराळं आणि आवरणं अगदीच निराळं.

जे आज ना उद्या म्हातारं होणार आहे त्या शरीराला कायमस्वरूपी तरूणच ठेवण्याचा अट्टाहास म्हणजे आसक्ती या आसक्तीमुळे दु:ख निर्माण होते. वयानुसार केस पांढरे होतात. पण काळ्या केसांवर प्रेम, तरूण दिसण्यावर प्रेम त्यामुळे कोणी म्हटले तुमचे केस पांढरे झाले तर दु:ख होते. काळ्या केसांवर प्रेम केले तर पांढरे केस दु:ख देतील. दु:ख कशातून निर्माण झाले ? आसक्तीतून दु:खातुन परत आसक्ती असे चक्र चालू होते. चेहऱ्यावर सुरकुत्या बघितल्या की दु:ख होते. 'अरेरे ! मी म्हातारा झालो.' मग ब्युटीपार्लरमध्ये फेशीयल-मसाज घेऊन चिरतरूण राहण्याचा प्रयत्न चालू होते.

आम्ही गावोगावी पदयात्रा करतो तेव्हा मला हे पाहून खूप आश्चर्य वाटते की झोपडपट्टीत सुध्दा ब्युटीपार्लर, टी.व्ही ! आत बसायला जागा नसते पण शरीर-मन सुखासाठी साधन असतात. एका आडत (अन्नधान्याच्या) दुकानाच्या मालकाने मला सांगितले, ''महाराज साहेब, लोक दुकानात जाऊन १० ग्रॅमची कॉस्मेटिकची ट्युब ५० रूपयात आनंदाने घेऊन येतात. पण ५० रू किलोचे गहू घ्यायला खूप भाव ताव करतात.'' हे आचरण आसक्तीतून निर्माण होते. अशाप्रकारे व्यक्ती शरीर आणि पदार्थात आसक्त होतो त्यातूनच दु:खाचा जन्म होतो.

**आसक्तीमुळे ग्लोबल वॉर्मिंग**

हे ग्लोबल वार्मिंग त्यामागे काय रहस्य आहे? निव्वळ आसक्ती एकमात्र कारण आहे. 'ए.सी.' मध्ये बसणारी लोक शरीराच्या आसक्तीत माणुसकी विसरून जातात. कारण जे 'ए.सी.' चा उपयोग करतात त्यांच्या जीवनाचं ब्रीद वाक्य असतं जगातील गारवा मी घेईल आणि माझ्या जवळचा सर्व उकाडा, उष्णता जगाला देईल.' कधी 'ए.सी.' गाडी किंवा घराजवळून गेला तर गाडी बाहेर-घराबाहेर हवा कशी जाणवते ? गार की गरमच ? एका व्यक्तीला थंडपणाच्या अनुभवासाठी किती व्यक्तींनी उष्णता सोसायची ? दुसऱ्याला दु:ख देऊन, सुख मिळवावं हे रावणाचं चरित्र आहे असे ते कसे काय परमात्म्याचे रामाचे वंशज होऊ शकतील ? हे ग्लोबल वॉर्मिंग कोणामुळे वाढले ? गरिबांमुळे की

श्रीमंतांमुळे ? 'मला सुख मिळाले पाहिजे, जगाला दुःख मिळाले तर चालेल.' ह्या वृत्तीतून आसक्तीच डोकावते आणि ही वृत्ती जोपर्यंत आहे तो पर्यंत दुःख मुक्ती होऊ शकत नाही. म्हणून भगवंत सांगतात --

**बहिया उड्ढमादाय, णावकंखे कयाइ वि ।**
**पुव्व-कम्म-क्खय-ट्ठाए, इमं देहं समुध्दरे ।।**

ही गाथा सर्व व्यथा दूर करणारी आहे म्हणून ह्या श्लोकाला आपल्या श्वासासम जगा. एकदा आतील ईश्वराला जागृत केले मग राक्षसाला जागा देऊ नका, एकदा कळसाला स्पर्श केला, एकदा कैलासापर्यंत पोहचले की पुन्हा नरकात पाताळात, पुन्हा दरीत कोसळू नका. एकदा परमात्म्याशी धागे जुळले आता पापाशी जुळवू नका .... एकदा चैतन्यसत्तेची चव घेतली आता जीवनाची चव घालवू नका.

शिखराची यात्रा करीत असताना एक सूत्र लक्षात ठेवा. **पक्खीपत्तं समादाय** - जे पंख उडण्यात कामी येत नाही, अडथळा निर्माण करतात असे पंख पक्षी आपल्या चोचीने काढुन फेकुन देतो अथवा अंग झटकून शरीरापासून वेगळे करतो. आपणही लक्षात घ्या आपल्या उन्नतीच्या मार्गात सिध्दीच्या मार्गात असताना एकच दृष्टिकोन ठेवला पाहिजे की मी तेच ग्रहण करेल, तेच सोबतीला ठेवीन, जे माझ्या उन्नतीच्या कामी येईल. भगवंत साधकाला उद्बोधन देत आहे की हे ! साधका, **तू तेवढीच साधने आपल्याजवळ बाळग जेवढी तुझ्या साधनेत साधक बनतील, जे साधनेत बाधक आहे ती बंधने आहेत. जे उपयोगात येत नाही त्या साधनांचा संग्रह करू नकोस. अन्नसुध्दा तेवढेच ग्रहण करा जेवढी शरीराला आवश्यकता आहे. अतिरिक्त अन्न शरीरावर चरबीच वाढवणार आहे. मग तो भार शरीरासाठी बाधाच निर्माण करतो.**

छोट्या-छोट्या क्षुल्लक गोष्टींमधून कशा ग्रंथी, बंधन होते या गाठी सिध्दीच्या मार्गावर अडथळा बनतात. या ग्रंथीपासून मुक्त होणारा निर्ग्रंथ होऊन जेव्हा चालतो तेव्हाच त्याला सत्याची - परमेश्वराची प्राप्ती होते. संघर्षमुक्त जीवन जगायचे असेल तर भयमुक्त-वैरमुक्त-ग्रंथीमुक्त अंतरंग करा.आनंदात जगा आणि सर्वांना जगू द्या.

आता यानंतर देहाचा उपयोग-सदुपयोग केवळ पापकर्माचा क्षय करण्यासाठी होवो अशाप्रकारची ज्यांची जीवन दृष्टी असते त्यांची करणी शुभ-शुभतम होत जाते, जगणे सार्थक होते परंतु जो या सत्याचा स्वीकार करीत नाही. त्याच्या जीवनाला आकारच येत नाही. दुर्दशा होते या दुर्दशेत दिशा मिळेल. ७ व्या अध्यायातून चला या दिशेत जाऊन जीवनाची दशा बदलू या. ●

(क्रमशः)


**कोणत्याही प्रसंगी देण्याची मौल्यवान भेट**

**'जैन जागृति' मासिक**

**आपले आप्त, स्नेहीजण, मित्र यांना भेट देण्याचा प्रसंग वर्षभरात खूप वेळा येत असतो. अशावेळी जैन जागृतिची वार्षिक / त्रिवार्षिक / पंचवार्षिक वर्गणी भरून आपल्या आवडणाऱ्या व्यक्तीस भेट म्हणून अवश्य द्या. जैन जागृतिचा अंक त्या व्यक्तीस दरमहा मिळत राहील आणि आपली आठवण दरमहा आपल्या आवडत्या व्यक्तीच्या मनात दरवळत राहील.**

**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर**

| | |
|---|---|
| पंचवार्षिक | रु. २२०० |
| त्रिवार्षिक | रु. १३५० |
| वार्षिक | रु. ५०० |

## कव्हर तपशील - नोव्हेंबर २०१६

❖ **'जैन जागृति' पर्युषण अंक प्रकाशन**

'जैन जागृति' सप्टेंबर २०१६ पर्युषण अंकाचे प्रकाशन ३ सप्टेंबर रोजी गणेश कला क्रिडा मंच, पुणे येथे राष्ट्रसंत श्री ललीतप्रभ सागरजी, श्री चंद्रप्रभसागरजी म.सा., मुनिश्री शांतीप्रियसागरजी व दादावाडीचे ट्रस्टी श्री. ओमप्रकाशजी राका, श्री. भवरलालजी जैन, श्री. संपतजी जैन, श्री. अशोकजी कटारिया, श्री. प्रवीणजी जैन, श्री. जयंतीलालजी जैन यांच्या हस्ते जैन जागृति मासिकाचे संपादक श्री. संजय चोरडिया व सौ. सुनंदा चोरडिया यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

❖ **श्री विजय वल्लभ स्कूल – चोरडिया निबंध स्पर्धा**

आचार्य श्री विजय वल्लभ स्कूल, पुणे येथे पर्युषण पर्वा निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन दरवर्षी होते. जैन जागृतिचे संस्थापक स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया यांच्या स्मरणार्थ निबंध स्पर्धेचे बक्षीस दिले जाते. २६ सप्टेंबर रोजी आचार्य श्री विजय वल्लभ महाराज पुण्यतिथी कार्यक्रमात निबंध स्पर्धेचे बक्षीस जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी चोरडिया यांच्या हस्ते देण्यात आले.

गच्छाधिपती आचार्य श्रीमद् नित्यानंद सुरीश्वरजी म.सा., मुनिराज श्री मोक्षनंद विजयजी म.सा., शाळेचे चेअरमन श्री. सुभाषजी परमार, जैन जागृतिचे संपादक श्री. संजयजी चोरडिया यांच्या सोबत पारितोषिक विजेते विद्यार्थी.

❖ **आनंद अचल ग्रुप फाऊंडेशन, पुणे**

आनंद अचल ग्रुप फाऊंडेशन तर्फे मुनिश्री अचलऋषिजी म.सा. यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त क्षेत्रपाल प्रतिष्ठान येथे १६ ऑक्टोबर रोजी अपंग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन केले. यावेळी मुनिश्री अचलऋषिजी म.सा. यांच्या सोबत फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. कुंदनमलजी दरडा, सचिव श्री. विलासजी पालरेशा, श्री. अभयजी दरडा, श्री. दिनेशजी कर्नावट, श्री. रविंद्रजी नहार, श्री. संजयजी चोरडिया, श्री. विजयजी समदडिया इ. मान्यवर.

❖ **जीतो फूड बँक, पुणे**

जीतो फूड बँकच्या साधर्मिक परिवारांना दीपावली निमित्त फराळाचे कच्चे सर्व पदार्थ, लाडू, चिवडा व नवीन साडीचे वितरण १६ ऑक्टोबर रोजी महावीर प्रतिष्ठान पुणे येथे संपन्न झाले. यावेळी मुख्य अतिथी जीतो पुणेचे अध्यक्ष श्री. विजय भंडारी, सचिव श्री. नरेंद्रजी छाजेड, श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. धनराजजी श्रीश्रीमाळ, श्री. संपतजी जैन, फूड बँकेचे अध्यक्ष श्री. राजेंद्रजी बाठिया व त्यांची सर्व टीम उपस्थित होती.

❖ **श्री. अशोकलाल शहा, पुणे – पुरस्कार**

पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. अशोकलाल रतनलालजी शहा यांना महाराष्ट्र शासनाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेन्द्रजी फडवणीस यांच्या हस्ते देण्यात आला.

❖ **मे. राजेंद्रकुमार मोहनलाल अ‍ॅण्ड कंपनी, पुणे**

पुणे येथील मे. राजेंद्रकुमार मोहनलाल अ‍ॅण्ड कंपनी यांना आलिशान बासमती राईसची संपूर्ण भारतात सर्वात जास्त विक्री केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पॅरीस येथे २२ सप्टेंबर रोजी सनस्टार ओव्हरसिस लिमिटेड – अलिशान बासमती राईस वार्षिक कॉन्फरन्समध्ये श्री. रोशनजी राजेंद्रजी बांठिया यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

❖ **संचेती परिवार, अधिवेशन – पुणे**

पुणे जिल्ह्यातील संचेती परिवाराचे अधिवेशन महावीर प्रतिष्ठान, पुणे येथे २ ऑक्टोबर रोजी संपन्न झाले. यावेळी दीप प्रज्ज्वलन करताना

आमदार श्री. चेनसुखजी संचेती, पद्मभूषण डॉ. के. एच. संचेती, कॉन्फरन्स महिला अध्यक्ष सौ. रुचिरा सुराणा, श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. अभयजी संचेती, श्री. मोहनलालजी संचेती, श्री. वालचंदजी संचेती, श्री. अशोकजी संचेती इ.

❖ **श्री. पारसजी मोदी, मुंबई – पुरस्कार**

मुंबई येथील प्रसिध्द उद्योगपती व धार्मिक, सामाजिक कार्यात सतत अग्रेसर श्री. पारसजी मोदी यांना जैन कॉन्फरन्स मुंबई-पुणे पंचम झोन शपथ ग्रहण कार्यक्रमात ''समाज चिंतामणी'' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. २८ सप्टेंबर रोजी पुणे येथे झालेल्या शपथ ग्रहण समारोहात श्री. मोहनलालजी चोपडा, श्री. केसरीमलजी बुरड, श्री. कांतीलालजी बोथरा, सौ. रुचिरा सुराणा, सौ. सुरेखा कटारिया यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

❖ **श्री. रमणलालजी लुंकड, पुणे – पुरस्कार**

पुणे येथील उद्योगपती व सामाजिक, धार्मिक कार्यात अग्रेसर श्री. रमणलालजी लुंकड यांना जैन कॉन्फरन्स मुंबई – पुणे पंचम झोन शपथ ग्रहण कार्यक्रमात ''जैन गौरव'' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कॉन्फरन्सचे अध्यक्ष श्री. मोहनलालजी चोपडा यांच्या हस्ते श्री. रमणलालजी लुंकड यांना सन्मान पत्र देण्यात आले.

❖ **बाफना ज्वेलर्स, भोसरी – उद्घाटन**

पिंपरी-चिंचवड मधील नामांकित सुवर्णपेढी बाफना ज्वेलर्स यांची भोसरी येथे भव्य शाखा सुरु करण्यात आली आहे. या शोरुमचे उद्घाटन १ ऑक्टोबर रोजी नगरसेवक श्री. अजित गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोबत श्री. चांदमलजी लुंकड, आमदार श्री. विलासजी लांडे, श्री. आनंदकुमारजी बाफना, श्री. अभिजित बाफना व श्री. निरज बाफना इ. मान्यवर.

❖ **श्री एजन्सी, चिंचवड – उद्घाटन**

चिंचवड येथील श्री. सुभाषजी पोपटलालजी ओस्तवाल (महावीर मंगल केंद्र) यांनी हायवे टॉवर बिल्डिंग, चिंचवड स्टेशन येथे श्री एजन्सी हे नवीन दुकान सुरु केले आहे. येथे लोणावळा येथील प्रसिध्द नवरत्न चिक्कीचे – चिक्की, चिवडा, फरसाण, डाळ, शेव इ. सर्व पदार्थ मिळतील. २९ ऑगस्ट रोजी श्री. गिरीशजी धनराजजी पारख यांच्या हस्ते दुकानाचे उद्घाटन करण्यात आले.

❖ **''निर्मित'' चिंचवड गाव – उद्घाटन**

चिंचवड, पुणे येथील श्री. निलेशजी, श्री. ललीतजी, श्री. अमितजी कटारिया बंधू (कलासागर गारमेंन्टस् प्रा. लि.) यांनी चाफेकर चौक, चिंचवडगाव, पुणे येथे ''निर्मित'' हे भव्य कापड दुकान सुरु केले आहे. १५ ऑक्टोबर रोजी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन संपन्न झाले. ●




**वधू-वर जाहिरात 'जैन जागृति' मासिकात व वेबसाईटवर द्या.**

**हजारो जैन परिवार व त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार पर्यंत पोहचा.**

**आपणांस वधू-वर निवडताना योग्य चॉईस मिळण्यास मदत होईल.**